| MHST140019042020 | **नियमित दिवाणी दावा क्र.१४२/२०२०**<br>**बाजीराव गणपत नलवडे व इतर**<br>**विरुध्द**<br>**हरिभाऊ महादेव पवार व इतर** |
|---|---|

**<u>निशाणी क्र. ५ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादींनी प्रतिवादींविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ३९ नियम १ अन्वये दाखल केलेला आहे.

२. वादींनी सदर अर्जामध्ये असे कथन केले आहे की, त्यांची मौजे शेरेचीवाडी (हिंगणगाव) येथील वादींचे वडिलार्जित मालकी हक्काची जमीन मिळकत गट क्र.२९/३/ब, क्षेत्र १.२१ आर, आकार ७.५० पै.त्यासी चतुःसिमा पुर्वेस–गट क्र.२३/१/२ दिनकर गायकवाड यांची जमीन, दक्षिणेस– रस्ता व ओढा, पश्चिमेस– अरुण शिंदे यांची गट क्र.२९/२ जमीन व उत्तरेस–गट क्र.२९/३/अ/२ हरिभाऊ पवार व हणमंत भुजंग जाधव यांची जमीन आहे. सदर मिळकतीस सोयीकरीता यापुढे 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येईल.

३. वादीचे असे कथन आहे की, दावा मिळकत ही वादींचे पूर्वज गणपत बाजीराव नलवडे यांनी दि.०८.०४.१९५२ रोजी महादेव बळवंत पवार यांचेकडून र.रु.६५०/– ला रजिस्टर खुष खरेदीखत क्र.२९६/१९५२ ने जिरायत जमीन खरेदी केलेली आहे. सदर मिळकतीचा जुना स.नं.२४८ होता. सन १९५२ साली खरेदीखताची नोंद व पोटहिस्से स.नं.२४८/३अ क्षेत्र १० एकर २९ आर महादेव बळवंत पवार व स.नं.२४८/३ब क्षेत्र ३ एकर गणपत बाजीराव नलवडे यांचे फे.नं. २५३८ ने नोंद झालेली आहे. तेव्हापासून हयात असेपर्यंत एकत्र कुटूंबासह वहिवाटीत होते. वादीचे वडील कै.गणपत बाजीराव नलवडे हे दि.०७.०१.२०११ रोजी मयत झालेनंतर दावा मिळकतीस वारसाहक्काने फे.नं.५४४ ने नोंद झालेली आहे. वादी हे मालकी हक्काने जमीन वहिवाटतात.

४. वादी पुढे असे कथन करतात की, सदर दावा मिळकतीची बांधबंदिस्ती, सपाटीकरण करुन बोअरवेल घेवून त्यावर पिके घेत आलेले आहेत.

दि.२०.०७.२०२० वादी हे दावा मिळकतीत ऊसाची लागण करणेकरीता ट्रॅक्टरने सरी काढत असताना प्रतिवादी हे त्याचे कुटूंबासह दावा मिळकतीत येवून ऊसाचे पिकास सरी काढणेस हरकत घेवू लागले व ट्रॅक्टर चालकास जीवे मारण्याची धमकी देवून वादींना दावा मिळकतीतुन बाहेर काढले. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी 'तु शेतात ऊस कसा लावतो ते आम्ही बघतो, जमीनीत आलास तर तुझा पाय काढतो' अशी वादी क्र.१ यांना धमकी दिली. त्यामुळे दि.२४.०७.२०२० रोजी वादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्याविरुद्ध लोणंद पोलिस स्टेशन येथे तक्रार अर्ज दिला. मात्र, त्यानंतर ही प्रतिवादी क्र.१ ते ४ हे वादी क्र.१ यांना वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण करतात व वादींना धमकी देवून त्रास देतात. वादींचे दावा मिळकतीचे होणारे नुकसान टाळणेकरीता प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी स्वतः अगर त्यांचे कुटूंबिय, नोकर किंवा एजंट यांचेमार्फत वादींचे दावा मिळकतीतील कब्जे वहिवाटीस, पिकांचे मशागतीस हरकत अडथळा करु नये अगर दावा मिळकतीतुन हुसकावून लावू नये म्हणून प्रतिवादी यांच्या विरुद्ध तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेबाबत विनंती केली आहे.

५. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी नि.क्र.२० वर त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे कथन आहे की, मौजे हिंगणगाव, ता. फलटण येथील जुना स.नं.२४८ या जमीनीचे स.नं.२४८/१, २४८/२ व २४८/३ असे पोटहिस्से होवून, पोटहिस्सा स.नं.२४८/३ क्षेत्र १३ एकर २९ गुंठे क्षेत्र हे प्रतिवादी यांचे वडिल महादेव बळवंत पवार यांचे वडिलार्जित मालकीचे होते. सदर जमीनीपैकी दक्षिणेकडील क्षेत्र ०३.०० एकर हे वादी यांचे वडिल गणपत बाजीराव नलवडे यांना दि.०८.०४.१९५२ रोजी खरेदी दिले. त्याप्रमाणे गावचे दप्तरी फेरफार क्र. २५३८ ने नोंदी होवून स.नं.२४८/३अ क्षेत्र १० एकर २९ गुंठे क्षेत्रास मुळ मालक महादेव बळवंत पवार यांचे व स.नं.२४८/३ब क्षेत्र ०३.०० एकर यास खरेदीदार गणपत बाजीराव नलवडे यांचे नाव दाखल झाले. त्याप्रमाणे पुर्वपार वादी व प्रतिवादी यांच्या वहिवाटी असून त्याबाबत कोणतीही तक्रार अगर हरकत नव्हती व नाही.

६. दावा जमीनीचा मुळ स.नं. २४८ असा असून शेरेचीवाडी विभाजनाने स.नं.२९ असा झालेला आहे. स.नं.२९ या जमीनीचे पोटहिस्से स.नं.२९/१, २९/२ व २९/३ असून स.नं.२९/३ हा प्रतिवादी यांचे मालकीचा होता. प्रतिवादी यांचे वडिल

यांनी स.नं.२९/३ पैकी ०१ हे.२१ आर क्षेत्र वादी यांना सन १९५२ मध्ये विक्री केले असल्याने त्याचा पोटहिस्सा होवून, स.नं.२९/३/ब असा झालेला आहे. परंतु, सदर पोटहिश्श्याचा अंमल मोजणी खात्याकडे झालेला नसून फाळणी नकाशा तयार झालेला नाही. त्यामुळे वादी यांचे स.नं.२९/३ब क्षेत्र ०१ हे.२१ आर या जमीनीच्या हद्दी कायम झालेल्या नाहीत. त्या हद्दी वादी यांनी फाळणी करुन, कायम करुन घ्यावेत. त्याबाबत प्रतिवादी यांची कोणतीही हरकत अगर तक्रार नाही. केवळ प्रतिवादी यांचे क्षेत्रामध्ये अतिक्रमण करुन, ज्यादा क्षेत्र वहिवाटीस मिळावे या हेतुने प्रतिवादी यांचे विरुद्ध खोटा व लबाडीने प्रस्तुतचा दावा दाखल केलेला असून प्रतिवादी यांचे विरुद्ध निरंतर ताकीद मिळावी याबाबत मागणी केलेली आहे. करीता, वादीचा प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

७. प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी नि.क्र.२२ ला जादा लेखी म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे म्हणण्यानुसार, वादीने दावा कलम १ मध्ये दिलेल्या मिळकतीचे वर्णन चुकीचे असून दावा मिळकतीच्या चतुःसिमा देखील चुकीच्या दिलेल्या आहेत. तसेच, वादीने दावा मिळकत मौजे शेरेचीवाडी हिंगणगाव, ता.फलटण येथील जमीन सर्वे नं.२९/३/ब मधील त्यांचे हिश्श्याचे मिळकतीपैकी ०० हे.०५ आर मिळकत ही पुजा सागर चौधरी यांचेसोबत दि.३१.१२.२०१८ रोजी मे. दु.निबंधक फलटण यांचे कचेरीत रजिस्टर अदला बदल दस्त क्र.४३२० अन्वये नोंदणीकृत केलेले आहे. त्यानंतर पुजा सागर चौधरी यांनी सदर जमीन ही हणमंत बाळासोा काळे यांना मे. दु.निबंधक फलटण यांचेकडील रजिस्टर खरेदीदस्त क्र.२२९५ दि.३०.०७.२०१९ रोजी विक्री केलेली आहे. सदरील खरेदीखताची नोंद ही महसुल दप्तरी फेरफार क्र.८५५ अन्वये झालेचे दिसून येते. त्यानंतर हणमंत बाळासोा काळे यांनी ती जमीन हणमंत भुजंगराव जाधव यांव रजिस्टर खरेदीदस्त क्र.६६३ दि.०२.०३.२०२० रोजी विक्री केलेली दिसून येत आहे. सदरील खरेदीखताची नोंद ही महसुल दप्तरी फेरफार क्र.८७८ अन्वये झालेचे दिसून येते.

८. वरील परिस्थिती पाहता वादीचे चतुःसिमेमध्ये पश्चिम बाजूस हणमंत भुजंगराव जाधव यांचे क्षेत्र आहे व त्याप्रमाणे वादीने दाव्यामध्ये चतुःसिमा नमुद करणे कायदयाने अपेक्षित होते. परंतु, वादीने सदरील बाब जाणून बुजून मे.न्यायालयापासून

लपविलेली आहे. दावा मिळकत सर्वे नं.२९/३/ब हा पुर्ण गोळा गट मिळकत असून सदरील दावा मिळकतीमध्ये हिस्सेदार यांचे क्षेत्राचे चतुःसिमापूर्वक अदयाप फाळणी झालेली नाही अथवा नकाशे तयार नाहीत. त्यामुळे मुळ स.नं.२९/३ मधील सर्व हिस्सेदार यांस प्रस्तुत दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार म्हणून सामील करुन घेवून त्यांचे म्हणणे मे. न्यायालयासमोर येणे कायदयाने आवश्यक आहे. त्यामुळे सदरील दाव्यास आवश्यक पक्षकारांची बाधा येत आहे. वादीचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे कधीही भरुन न येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे. करीता, वादींचा प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

९. वादी व प्रतिवादींच्या कथनांचा व दाखल कागदपत्रांचा विचार करता खालील मुद्दे माझ्यासमक्ष उपस्थित होतात. त्यांचे निष्कर्ष मी त्याखाली दिलेल्या करणांसह खालीलप्रमाणे नोंदवीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी सिद्ध करतात काय की, त्यांच्या लाभात प्रथमदर्शनी केस आहे? | होय. |
| २. | वादी सिद्ध करतात काय की, न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने आहे? | होय. |
| ३. | वादी सिद्ध करतात काय की, त्यांच्या लाभात मनाई हुकूम न दिल्यास त्याचे अपरिमित व कशानेही न भरून येणारे नुकसान होणार आहे? | होय. |
| ४. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

१०. वादीने सदर अर्जाचे समर्थनार्थ संचिकेवर गट क्र.२९/३ब चा ७/१२ उतारा, फेरफार क्र.२५३८ व ५४४ यांच्या सत्यप्रती दाखल केलेल्या आहेत. प्रतिवादी यांनी फेरफार क्र.८७८, ८५५, ८४२ यांच्या प्रती, सर्वे नं.२९ चा गट नकाशा दाखल केलेला आहे.

## मुद्दे क्र.१ ते ३ करीता –

११. वादीने दाखल केलेल्या अर्जाचे, तसेच प्रतिवादींनी त्यावर दिलेल्या म्हणण्याचे तसेच संचिकेवर दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. संचिकेवरील दाखल गट क्र.२९/३ब याचे ७/१२ उता–यावरुन असे दिसून येते की, त्यावर वादी यांचे भोगवटादार सदरी नावे आहेत. फेरफार क्र.२५३८ यावरुन असे दिसून येते की, दावा मिळकत ही वादी यांचे वडिल गणपत नलवडे यांनी महादेव पवार यांच्याकडून खरेदीखताने विकत घेतलेली आहे. फेरफार क्र.५४४ यावरुन असे दिसून येते की, वादी यांचे वडिल गणपत नलवडे हे दि.०७.०१.२०११ रोजी मयत झाले आहेत व वादी यांची नावे वारसा हक्काने दावा मिळकतीला लागलेली आहेत. वादींचे असे कथन आहे की, ते दावा मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत. प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत नि.क्र.२० मध्ये प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या वडिलांनी वादी यांच्या वडिलांना दि.०८.०४.१९५२ रोजी दावा मिळकत ही खरेदीखताने दिल्याचे मान्य केलेले आहे. तसेच, दावा मिळकतीस वादी यांच्या वडिलांचे नाव लागल्याचे ही त्यांनी मान्य केलेले आहे. प्रतिवादी यांनी असे ही मान्य केले आहे की, खरेदीखताप्रमाणे पूर्वपार वादी व प्रतिवादी यांच्या वहिवाटी आहेत. त्यामुळे प्रतिवादी यांनी दावा मिळकतीवरील वादी यांची मालकी व वहिवाट मान्य केली असल्याचे प्रतिवादी यांच्या कैफियतीवरुन प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

१२. वादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये प्रतिवादी क्र.१ ते ४ हे वादींच्या दावा मिळकतीवरील शांततामय कब्जे वहिवाटीस अनाधिकाराने हरकत अडथळा करीत असल्याचे कथन केलेले आहे. दि.२०.०७.२०२० रोजी प्रतिवादी यांनी वादी हे दावा मिळकतीत ट्रॅक्टरने सरी काढत असताना हरकत घेतली असल्याचे कथन केले आहे व वादींना व ट्रॅक्टर चालकाला जीवे मारण्याची धमकी देवून दावा मिळकतीतुन बाहेर काढल्याचे कथन केले आहे. वादींनी प्रतिवादींविरुद्ध पोलिस स्टेशनला तक्रार दिल्याचे ही कथन केले आहे. वादींनी त्यांच्या अर्जातील कथनांच्या पृष्ठयर्थ त्यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्यामुळे वादींच्या कथनांवरुन असे प्रथमदर्शनी दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी वादी यांच्या दावा मिळकतीवरील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण केलेला आहे. प्रतिवादी यांनी वादी यांची दावा मिळकतीवर सन

१९५२ पासून वहिवाट असल्याचे मान्य केले असल्यामुळे दावा मिळकतीचा शांततामय उपभोग घेण्याचा वादी यांना अधिकार आहे. परंतु, प्रतिवादी हे वादी यांच्या दावा मिळकतीवरील वहिवाटीस हरकत अडथळा करीत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या विरुद्ध मनाई हुकूम देणे गरजेचे वाटते. वादीच्या लाभात मनाई हुकूम न दिल्यास ते दावा मिळकतीचा शांततामय उपभोग घेवू शकणार नाहीत व परिणामी त्यांचे कशानेही न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सोयीचा समतोल हा वादीच्या लाभात आहे. त्यामुळे वर नमुद कारणास्तव मी मुद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र ४ करीता–**

१३. वरील मुद्दयांचे होकारार्थी निष्कर्ष पाहता वादीचा मनाई हुकूमाचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करीता, मी मुद्दा क्र.४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. वादीचा अंतरिम/ तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी स्वत: अथवा त्यांचे नोकर, प्रतिनिधी, वारस किंवा इतर कोणत्याही इसमांमार्फत वादी यांचे दावा मिळकतीवरील असलेल्या शांततामय कब्जे वहिवाटीस कोणत्याची प्रकारचा अडथळा निर्माण करून नये असा अंतरिम मनाई हुकूम हा प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या विरुद्ध सदर दाव्याचा निकाल लागेपर्यंत किंवा न्यायालयाचे पुढील आदेशापर्यंत देण्यात येत आहे.

ANIL SITARAM SATOTE
Digitally signed by ANIL SITARAM SATOTE
Date: 2025.07.29 17:05:05 +0530

फलटण. (अ. सि. साटोटे)

दि.२९.०७.२०२५ २ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, फलटण